नि. फौ. ख. क्र.१४२/२०२०
सरकार वि. आदेश उर्फ आदित्य
नि.क्र.३२

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ यांचा पुरावा.**
**मी शपथेवर कथन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **नाव** | **–** | **अजय गणेश वाकोडे,** |
| **वय** | **–** | **२५ वर्ष, व्यवसाय– मजुरी,** |
| **रा** | **–** | **जामठी बु., ता. मुर्तिजापूर, जि. अकोला.** |

**यांचा सरतपास, सहायक सरकारी अभियोक्ता श्री.जी. एम.गव्हाळे यांच्या मार्फत सुरु –**
**(वेळ– ०१.२०)**

**१.** मी आरोपीला ओळखते. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे. घटना दि.०६.०६.२०२० रोजी संध्याकाळी ०६.०० वाजताच्या दरम्यान माझ्या राहत्या घराच्या जवळ घडली. त्यावेळी मी घराच्या बाहेर उभा होता. त्यावेळेस अतुल तायडे, शाम हिवराळे व मी गप्पा मारत होतो. त्यावेळी आदेश तायडे हा दारुपिवून तेथे आला व शिवीगाळ करु लागला. त्यावेळी मी त्यास शिवीगाळ करु नको असे म्हणालो. त्यानंतर आरोपीने त्याच्या हातातील काठीने मला मारहाण केली. माझे मामा मंगेश सावळे व शाम हिवराळे हे भांडण सोडविण्याकरीता आले असता आरोपीने काठी खाली टाकून घरी गेला. आरोपीने घरुन लोखंडी पाईप आणला व माझे मामा मंगेश सावळे च्या जबडयावर मारला. त्यामुळे माझे मामा खाली पडले. त्यानंतर अतुला तायडे व गजानन गवई यांनी माझ्या मामाला दवाखान्यात घेवून गेले. दवाखान्यामध्ये मामाला जबडयावर फॅक्चर आहे असे सांगितले. आरोपीने ज्या लोखंडी पाईपने मारहाण केली तो पाईप मला दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला आर्टिकल अ दाखविण्यात आला. सदर पाईप तोच आहे. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्री.पी. पी. पाटील यांच्या मार्फत सुरु–**

**२.** मला आरोपीने काठीने मारहाण केल्याच्या मी दवाखाना केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कोणत्याही प्रकारची मारहाण केली नाही म्हणून मी दवाखाना केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला माझे वैद्यकिय प्रमाणपत्र मागितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणत्याही प्रकारचा मार लागला नव्हता म्हणून मी त्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र पोलीसांना दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मारहाण केली नाही म्हणून मी त्याचा दवाखाना केला नाही म्हणून मी त्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र दाखल केले नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे मामा मंगेश सावळे हे घटनेच्या काही दिवसा अगोदर आरोपीच्या बहिणीच्या घरी दारु पिवून गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या मामानी आरोपीची बहिण व जावाईसोबत भांडण केले व आरोपीच्या बहिणीचा गळा दाबला. हे म्हणणे खरे नाही की, माझे व माझ्या मामाचे आरोपीसोबत घटनेच्या अगोदरपासून पटत नव्हते.

४. मी माझा जबाब नोंदवितांना 'घटनेच्या अगोदर मी, शाम हिवराळे व अतुल तायडे हे गप्पा मारत उभे होतो' ही बाब पोलीसांना सांगितली होती. मी माझा जबाब नोंदवितांना 'घटना माझ्या घरासमोर घडली' ही बाब पोलीसांना सांगितली होती. तसेच डॉक्टरांनी माझ्या मामाला फॅक्चर आहे ही बाब देखील सांगितली होती. सदरहू दोन्ही बाबी माझ्या जबाबात नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर बाबी घडल्या नाही म्हणून मी पोलीसांना सांगितल्या नाही म्हणून त्यांनी माझ्या जबाबात लिहील्या नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी माझे घर व माझ्या मामाचे घर यामध्ये ५ ते ६ घराचे अंतर होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे घर हे माझ्या घराच्या दहा ते पंधरा घराच्या अंतरावर आहे.

६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने लोखंडी पाईप त्यांच्या घरातून आणला ही बाब मी खोटी सांगितली. आर्टिकल अ प्रमाणे वस्तु बाजारात सहज उपलब्ध आहे किंवा नाही हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल अ मी पोलीसांना दिला. हे म्हणणे खरे नाही की, माझे व माझा मामा मंगेश सावळे याचे आरोपीसोबत पटत नाही म्हणून आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्याप्रमाणे घटना घडली नाही.हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण (वेळ– ०१.४०),**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

ठिकाण:मुर्तिजापूर
दि. २५/११/२०२४.

आर. आर. पकडे
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२) मुर्तिजापूर.